


# हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

अमृत ७५ महोत्सव

epaper.dainikhindusthan.com





■ वर्ष ७५ वे/अंक ३५३ वा ■ ■ अमरावती,रविवार,दिनांक १० ऑगस्ट २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २१ श्रावण १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







# तर मोदी पंतप्रधान झालेच नसते, लोकसभा निवडणुकीतील 'हेराफेरी' सिद्ध करू

## राहुल गांधी पुन्हा आयोगावर तुटून पडले



नवी दिल्ली दि. ९ : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या १० दिवसांत तिसऱ्यांदा निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला आहे. राहुल गांधी यांनी शनिवारी सांगितले की, भारताची निवडणूक व्यवस्था मृतावस्थेत आहे. लोकसभा निवडणुकीत हेराफेरी कशी होऊ शकते हे आम्ही येत्या काळात तुम्हाला सिद्ध करू आणि ते घडलेही. देशाच्या पंतप्रधानांकडे खूपच कमी बहुमत आहे. जर १०-१५ जागांवरही हेराफेरी झाली नसती तर ते भारताचे पंतप्रधान झाले नसते. राहुल यांनी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित वार्षिक कायदेशीर परिषदेत बोलताना हल्लाबोल केला.

त्याच वेळी, निवडणूक आयोगाने १२ जून रोजी राहुल गांधींना पाठवलेले पत्र प्रसिद्ध केले आहे. एउख नुसार, हे पत्र त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीबाबत केलेल्या विधानांवर पाठवण्यात आले आहे आणि त्यांना भेटून आरोप सिद्ध करण्यास सांगितले आहे. राहुल यांनी अद्याप या *(उर्वरित पान २ वर)*

# विधानसभेआधी दोन व्यक्तींनी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती

## शरद पवारांचा मोठा गौप्यस्फोट



मुंबई दि. ९ : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याचा गंभीर आरोप नुकताच केला आहे. त्यांच्या आरोपामुळे देशभरात एकच खळबळ उडाली आहे. दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत काही पुराव्यांचं सादरीकरण केलं. दरम्यान, राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांनंतर शरद पवार यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

'राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांची सखोल चौकशी झाली पाहिजे आणि आम्हाला निवडणूक आयोगाकडून उत्तर हवं आहे, भाजपाकडून नाही', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान, यावेळी माध्यमांशी बोलताना शरद पवारांनी आणखी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. 'विधानसभेच्या निवडणुकी आधी दोन व्यक्तींनी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती', असं मोठं विधान शरद पवार यांनी केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. *(पान २ वर)*

# अवघ्या १२ तासांत पुण्याहून नागपूर गाठा

## वंदे भारत एक्स्प्रेसचा आज शुभारंभ



नागपूर दि. ९ : पंतप्रधान नरेंद्र मोदी १० ऑगस्ट रोजी तीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील, ज्यात नागपूरहून पुण्याला जाणाऱ्या भारतातील सर्वात लांब अंतराची वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनचा समावेश आहे. ही ट्रेने नागुपरातील अजनी येथून पुणेदरम्यान धावेल. विशेष म्हणजे, ही ट्रेन अवघ्या १२ तासांत ८८१ किमी अंतर पूर्ण करेल. त्यामुळे नागपूर ते पुणे ताटकाळत प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, रेल्वे मंत्रालयाने नागपूर - पुणे वंदे भारत एक्सप्रेससाठी अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. मात्र, ही सेवा नेमकी कोणत्या तारखेपासून सुरू होणार आहे, याबाबत *(पान २ वर)*

# निवडणूक आयोगाची सर्वात मोठी कारवाई ३३४ राजकीय पक्षांना दाखवला घरचा रस्ता

नवी दिल्ली दि. ९ : केंद्रीय निवडणूक आयोगाने ३३४ राजकीय पक्षांना देशातील नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून काढून टाकण्याची मोठी कारवाई शनिवारी केली. आयोगाच्या या निर्णयानंतर आता फक्त ६ राष्ट्रीय आणि ६७ प्रादेशिक आणि २,५२० नोंदणीकृत मान्यता असलेले राजकीय पक्ष देशात आहेत. तथापि आयोगाने यादीतून वगळलेल्या राजकीय पक्षांना अपील करण्यासाठी ३० दिवसांची मुदत दिली आहे. राष्ट्रीय ६ पक्षांमध्ये भाजप आणि काँग्रेस व्यतिरिक्त आम आदमी पक्ष, बसप, माकप आणि एनपीपी यांचा समावेश आहे. आयोगाच्या यादीनुसार देशात समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल यांसारखे ६७ पक्ष प्रादेशिक पक्ष म्हणून नोंदणीकृत आहेत.

आयोगाने म्हटले आहे की, यादीतून वगळलेले राजकीय पक्ष लोकप्रतिनिधी *(पान २ वर)*

# पाकिस्तानचे पाच फायटर जेट पाडले, ३०० किमीवरुन लक्ष्यभेद केला; ऑपरेशन सिंदूरवरुन वायूदल प्रमुखांचा मोठा खुलासा

नवी दिल्ली दि. ९ : ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानचे नेमके किती नुकसान केले असा प्रश्न सातत्याने विचारला जातो. त्यावर आता खुद्द वायूदल प्रमुखांनीच उत्तर दिलं. भारतीय वायूसेनेने 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानच्या ५ लढाऊ विमानांसह एका मोठ्या विमानाचा नाश केल्याची माहिती एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंह यांनी दिली. हा हल्ला पाकिस्तानच्या हद्दीत तब्बल ३०० किलोमीटर अंतरावरून करण्यात आला. जमिनीपासून ते आकाशात करण्यात आलेला हा हल्ला म्हणजे भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विक्रम ठरल्याचं अमर प्रीत सिंह म्हणाले.

बंगळुरुतील एअर चीफ मार्शल एल. एम. कात्रे मेमोरियल *(पान २ वर)*

























एकबार अवश्य ले जाइये
गॅरंटी के साथ में,
एक बार लेंगे
बारबार ले जायेंगे
: मिळण्याचे ठिकाण :
सरस्वती मिल्क
१) डॉ.कुथे हॉस्पीटल जवळ,राजापेठ
२) चित्रा चौक
३) हबीब नगर
४) दस्तूर नगर
५) चपराशीपुरा



■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम